# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
# सोमवार दिनांक १४ सप्टेंबर २०२६
# ठळक बातम्या

1. **राज्यभर गणेशोत्सवाचा उत्साह; प्रदूषणमुक्त उत्सव साजरा करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन.**
2. **गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यात 'श्रीगणेशा आरोग्याचा' हे अभियान राबविण्यात येणार.**
3. **बहुभाषिक संस्कृती असलेल्या महाराष्ट्रानं सर्व भाषकांना मोठ्या मनानं सामावून घेतलं असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं प्रतिपादन.**
4. **दुष्काळसदृश जिल्ह्यांच्या यादीत बुलढाण्याचा समावेश करण्याची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची मुख्यमंत्र्यांकडं मागणी.**

## आता सविस्तर बातम्या .......

मुख्यमंत्री /गणेशोत्सव

आज भाद्रपद शुद्ध चतुर्थी म्हणजेच गणेश चतुर्थी. १० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाचा प्रारंभ आज झाला. गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीनं आणि कमीतकमी प्रदूषण होईल, अशा प्रकारे साजरा करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. मुंबईत वर्षा निवासस्थानी श्री गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना आणि पूजा केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

गणेशोत्सव

श्री गणेशाच्या आगमनानं आज विदर्भात भक्तिमय वातावरण निर्माण झालं आहे. नागपुरातील प्रसिद्ध चितार ओळीत गणेशमूर्ती खरेदीसाठी सकाळपासूनच नागरिकांची गर्दी झाली होती. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, भाविकांना कोणताही त्रास होऊ नये

तसेच अनुचित घटना घडू नयेत, यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ऐकूया सविस्तर वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून –

*इसवी सन 1728 पासून ऐतिहासिक आणि पारंपरिक वारसा जपत नागपूरचे महाराज राजे मुधोजी भोसले यांच्या सिनियर भोसला पॅलेस या निवासस्थानी यंदा 298 व्या वर्षी श्री गणरायाचं पारंपरिक पद्धतीनं पालखीतून आगमन झालं. विधिवत पूजाअर्चा आणि धार्मिक विधी पार पाडून गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यात आली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या महालातील वाड्यावर तसंच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कोराडी इथल्या निवासस्थानी बाप्पाचं भक्तिमय वातावरण आगमन झालं. यवतमाळमध्ये पालकमंत्री संजय राठोड यांच्या निवासस्थानी आज श्रीगणेशाची स्थापना करण्यात आली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत 'श्रीगणेशा आरोग्याचा' हे अभियान राबविण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करणं आणि गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देणं, हा या अभियानाचा उद्देश आहे. या अंतर्गत १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या सहकार्यानं समुदाय आरोग्य शिबिरं आणि रक्तदान शिबिरांचं आयोजन करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून अमरावती जिल्ह्यातही 'श्रीगणेशा आरोग्याचा' हा अभिनव उपक्रम व्यापक स्तरावर राबविण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यात यंदा १५ हजार ८८५ ठिकाणी गणेशमूर्तींची स्थापना होणार आहे. उत्सवाच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तब्बल ३ हजार ५०० पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि सुरक्षा जवानांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलिस प्रशासनानं कर्णकर्कश डीजे तसंच ध्वनी प्रदूषण करणाऱ्या वाद्यांना परवानगी नाकारल्यानं यवतमाळ इथल्या श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक आणि  बालसंस्कार केंद्रातील गणेशोत्सव मंडळानं यंदा पारंपरिक पद्धतीनं गणरायाचं स्वागत केलं. पारंपरिक ढोलकी, टाळ-मृदुंगाच्या गजरात गणेशाची उत्साहात स्थापना करण्यात आली. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी नम्रता फलके)*

रीळ स्पर्धा

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने गणेशोत्सवातील कला, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाला जागतिक स्तरावर

डिजिटल व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी ‘जागतिक महागणेशोत्सव रील स्पर्धा’ आयोजित करण्यात आली आहे. ‘जागर कलेचा, समृद्ध परंपरेचा..!’ या संकल्पनेवर आधारित ही स्पर्धा महाराष्ट्रासह भारतातील आणि जगभरातील स्पर्धकांसाठी खुली आहे.या स्पर्धेत ‘जागतिक सर्वोत्तम रील’ ठरणाऱ्या स्पर्धकाला १ लाख रुपये, तर महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्वोत्तम रीलसाठी प्रत्येकी ५० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. स्पर्धेच्या अंतिम सूचना, नियम आणि प्रवेशासंबंधी सविस्तर माहितीसाठी "फिल्मसिटी गणेश रिल्स डॉट कॉम" या संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आलं आहे.

अमित शाह

महाराष्ट्राची संस्कृती ही बहुभाषिक असून महाराष्ट्रानं सर्व भाषिकांना मोठ्या मनानं आपल्यात सामावून घेतलं आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केलं. नवी मुंबईत वाशी इथं हिंदी दिवस आणि सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. या सर्व भाषांचा स्वर वेगवेगळा असला, तरी गीत एकच आहे. भारतीय भाषांना विज्ञानाची, साहित्याची भाषा करायचं आहे, एकमेकींशी जोडायचं आहे. त्यामुळे राजकीय मतभेद सोडून भारतीय भाषांना चालना देण्याचं आवाहन शाह यांनी यावेळी केलं. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते. यावेळी शाह यांनी राजभाषा गौरव आणि राजभाषा कीर्ती पुरस्कारांचं वितरण केलं; तसंच विविध पुस्तकं आणि ॲप्सचं लोकार्पणही शाह यांच्या हस्ते झालं.

मनोज जरांगे

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे उद्या १५ सप्टेंबरला एकटेच मुंबईकडं प्रस्थान करणार असून त्यांनी इतर मराठा बांधवांना मुंबईकडं न येण्याचं आवाहन केलं आहे. बीड नंतर पाली, मांजरसुंबा, लिंबा गणेश, पाटोदा मार्गे ते मुंबईकडं रवाना होतील. आयोजकांनी प्रशासनाला शांतता आणि वाहतूक व्यवस्थेसाठी सहकार्य करण्याचं आवाहन केलं आहे.

राज्यमंत्री प्रतापराव जाधव

पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे बुलढाणा जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, १८ दुष्काळसदृश जिल्ह्यांच्या यादीत बुलढाणा जिल्ह्याचा तातडीनं समावेश करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत द्यावी, अशी मागणी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडं लेखी पत्राद्वारे केली आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्यानं खरीप पिकांवर गंभीर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर शासनामार्फत १८ दुष्काळसदृश जिल्ह्यांचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. मात्र, या यादीत बुलढाणा जिल्ह्याचा समावेश नसल्यानं जिल्ह्यातील सद्यस्थितीचा तातडीनं फेरआढावा घेण्याची गरज असल्याचं जाधव यांनी पत्रात नमूद केलं आहे. पर्जन्यमान अहवालानुसार २ सप्टेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात बुलढाणा जिल्ह्यातील पर्जन्यमान सामान्यापेक्षा सुमारे ८७ टक्के कमी नोंदविण्यात आलं आहे. त्यामुळं प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत आणि पीकनुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

महसूलमंत्री बावनकुळे

गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर राज्यातील सर्व पक्ष आणि समाजातील नागरिकांनी आंदोलनाऐवजी महाराष्ट्राच्या विकासासाठी एकजुटीनं रहावं, असं आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. गणेशोत्सवानिमित्त त्यांनी नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. गणपती उत्सवाचे हे दहा दिवस महाराष्ट्राला मजबुती देणारे असून, महाराष्ट्र, समाज तसंच कोणत्याही व्यक्तीला गालबोट लागणार नाही, याची काळजी घ्यावी, असं आवाहन त्यांनी केलं. १८ जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थितीची आकडेवारी प्रशासनाकडून प्राप्त झाली असून, ही आकडेवारी मंत्रिमंडळासमोर मांडणार आहे. ज्या भागात पाऊस चांगला झाला आहे, तिथं पुन्हा सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रासाठी सर्वेक्षणाचे आदेश देण्यात आले असून, सध्या १८ जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित केलं जात असल्याचं देखील बावनकुळे यांनी यावेळी स्पष्ट केलं.

मंत्री फुंडकर

पावसातील खंड आणि कमी पावसामुळे अकोला जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीची शासन स्तरावर दखल घेण्यात आली असून, शेतकरी बांधवांना परिपूर्ण मदत मिळवून देण्यात येईल. एकही नुकसानबाधित शेतकरी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली. त्याचप्रमाणं, गावांमधील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांसाठी चारा आणि पाण्याची स्थिती याचीही नोंद घेऊन मदतीच्या अनुषंगानं कार्यवाही होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

घाऊक निर्देशांक

अन्नपदार्थ, इंधन, ऊर्जा तसंच औद्योगिक उत्पादनांच्या किमतीत वाढ झाल्यानं ऑगस्ट महिन्यात घाऊक किमतीवर आधारित चलन फुगवट्याच्या दरात ९ पूर्णांक ९२ शतांश टक्के वाढ झाली. केंद्र सरकारनं आज ही आकडेवारी जाहीर केली. जुलै महिन्यात ६ पूर्णांक ६५ शतांश टक्के वाढ दाखवणारा अन्नपदार्थ निर्देशांक ऑगस्ट महिन्यात ७ पूर्णांक ५ शतांशांनी वाढला. इंधन आणि ऊर्जा क्षेत्रांचा घाऊक किंमतीवर आधारित चलन फुगवट्याचा दर २२ पूर्णांक ९३ शतांश टक्के राहिला. पश्चिम आशियातली युद्ध परिस्थिती आणि त्यामुळे झालेली होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी यामुळे घाऊक किंमत निर्देशांकानं वरच्या दिशेनं प्रवास केला आहे, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे.

अमेरिकन ओपन

अलेक्झांडर झ्वेरेव्हनं अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. रात्री उशिरा झालेल्या सामन्यात त्यानं बेन शेल्टनवर ६-३, ७-६, ५-७, ६-२ अशी मात केली. या हंगामातलं झ्वेरेव्हचं हे दुसरं ग्रँडस्लॅम अजिंक्यपद आहे. जून महिन्यात त्यानं फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेचं जेतेपद मिळवलं होतं.

नोव्हाक जोकोविच

दरम्यान, अमेरिकन ओपनच्या पहिल्या फेरीतल्या धक्कादायक पराभवानंतर, सर्बियाचा २४ वेळचा ग्रॅंडस्लॅम विजेता नोव्हाक जोकोविच जाहीर झालेल्या ताज्या एटीपी क्रमवारीतून अव्वल १० मधून बाहेर पडला आहे. तो आता जगात १२ व्या क्रमांकावर आहे.

हवामान / पाऊस

मागील २४ तासांत अकोला शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी रिमझिम, तर काही भागांत जोरदार पाऊस झाला. दिवसभरात शहरात ५ पूर्णांक ३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना या सरींमुळे काहीसा दिलासा मिळाला असला, तरी पावसाचं प्रमाण आणि वितरण अद्याप समाधानकारक नसल्यानं दुष्काळाचं सावट कायम आहे. दरम्यान, येत्या काही तासांत अमरावती, यवतमाळ, वाशिम आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

****